
ePaper

## ‘शपथपत्र देऊन जात बदलता येते का?’ छगन भुजबळांचा सवाल!



| वर्ष - 7 | अंक - 258 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज (TM)

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | सोमवार, दिनांक 29 जानेवारी 2024 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

### आतील पानांत


- चौथ्या दिवशी इंग्लंडची कमाल
- यामीच्या घरी गुडन्यूज?
- नितीश कुमार पुन्हा मुख्यमंत्री
- ओबीसीचा घास हिरावण्याचा प्रयत्न


# आयुक्त, जिल्हाधिकाऱ्यांची खांदेपालट?

## »प्रशासकीय हालचालींना वेग: शेखर सिंह, राजेश देशमुख यांच्या बदलीची शक्यता

।पुणे ।महाईन्यूज ।।

**लोकसभा निवडणुकांपूर्वी तीन वर्षांहून अधिक काळ एका ठिकाणी काम करणाऱ्या सनदी अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या जाण्याची शक्यता असल्याने पुण्यातील कारभार कोणाकडे जाणार, ही चर्चा आता रंगू लागली आहे. पुण्याचे जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांचा कार्यकाल पूर्ण झाल्याने त्यांच्या बदलीची सर्वाधिक चर्चा असून, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी साताऱ्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना पुण्यातील बैठकीत थेट विचारणा केल्याने त्यांना पुण्यात संधी मिळण्याची शक्यता वर्तविली जात आहे.**





पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांना मुख्यमंत्र्यांची पसंती असून, अजितदादांच्या ‘गुडबुक’मधील क्रीडा आयुक्त डॉ. सुहास दिवसे यांच्यासह आणखी काही अधिकाऱ्यांच्या नावाची जिल्हाधिकारीपदासाठी चर्चा आहे.

जिल्हाधिकारी डॉ. देशमुख यांना कार्यकाळापेक्षा अधिक काळ काम करण्यास संधी मिळाली आहे. ते सचिवपदासाठी पात्र असल्याने त्यांची बदली कोठे होणार याची उत्सुकता आहे. राज्यस्तरीय जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत साताऱ्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांना अजितदादांनी ‘येता का पुण्याला,’ म्हणून विचारणा केली. तेव्हापासून डुडी यांचे नाव पुण्याच्या जिल्हाधिकारीपदी चर्चेत आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंह यांच्या नावाला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची पसंती असल्याने त्यांचे नाव चर्चेत आले आहे, तर राज्याचे क्रीडा आयुक्त म्हणून काम करणारे डॉ. सुहास दिवसे यांचेही नाव जिल्हाधिकारीपदासाठी चर्चेत आहे. ते अजितदादांच्या ‘गुडबुक’मधील आहेत.

याशिवाय ‘सिडको’चे सहव्यवस्थापकीय संचालक डॉ. कैलास शिंदे, रायगडचे जिल्हाधिकारी डॉ. योगेश म्हसे, कोकण विभागीय आयुक्तालयातील अपर आयुक्तावरून नव्या पदाच्या प्रतीक्षेत असलेले किसन जावळे, नोंदणी मुद्रांक महानिरीक्षक हिरालाल सोनवणे यांचीही नावे चर्चेत आहेत. त्यामुळे पुण्याच्या जिल्हाधिकारीपदी कोणाची वर्णी लागणार हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार आहे.

### दोन दिवसांत बदल्यांचे आदेश जारी?

» मार्चमध्ये लोकसभेच्या निवडणुकीची आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे. निवडणूक आयोगाच्या निकषानुसार, पुण्यात तीन वर्षांपेक्षा अधिक काळ नोकरी केलेल्या ‘आयएएस’ अधिकाऱ्यांची पुण्याबाहेर बदली होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. त्यामध्ये पुणे विभागाचे विभागीय आयुक्त सौरभ राव, पुणे महापालिकेचे आयुक्त विक्रमकुमार; तसेच जिल्हाधिकारी डॉ. राजेश देशमुख यांचा समावेश आहे. डॉ. देशमुख पुण्याबाहेरील शहराच्या महापालिका आयुक्तपदी नियुक्त होण्याचीही चर्चा आहे, तर विक्रमकुमार यांना कोठे संधी मिळणार याची उत्सुकता आहे. आगामी दोन दिवसांत जिल्हाधिकारीपदासह अन्य अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी होण्याची शक्यता जाणकारांनी वर्तविली आहे.

# हिंजवडीत आयटी अभियंता प्रियसीची हत्या!

## »उत्तर प्रदेशच्या तरुणाला अटक : प्रेम प्रकरणातून कृत्य केल्याचा संशय

।पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।

**आयटी अभियंता तरुणीचा प्रियकराने गोळ्या झाडून खून केल्याचा प्रकार हिंजवडीतील लक्ष्मी चौकात रविवारी (ता. २८) हा उघडकीस आला. याप्रकरणी मुंबई पोलिसांनी प्रियकर तरुणास ताब्यात घेतले आहे.**

वंदना द्विवेदी (रा. उत्तर प्रदेश) असे खून झालेल्या तरुणीचे नाव आहे. याप्रकरणी ऋषभ निगम (रा. उत्तर प्रदेश) असे ताब्यात घेतलेल्या तरुणाचे नाव आहे. पोलिसांनी दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार, ऋषभ निगम हा वंदना हिचा प्रियकर आहे.

त्याने वंदनाला उशिरा शनिवारी (ता. २७) रात्री लक्ष्मी चौकातील कीर्ती आंगण या परीसरातील ओयो टाऊनहॉस या लॉजवर बोलावून घेत एका रूममध्ये तीच्यावर गोळ्या झाडल्या. यात तिचा मृत्यू झाला. याबाबत माहिती मिळताच हिंजवडी पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. वंदना ह्या इन्फोसिसमध्ये सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे.



### मुंबईला पळून जाताना आरोपीला पकडले...

»लखनऊ वरुन आलेल्या ऋषभ निगम याने तिची हत्या करून तो मुंबईला पळून जात असताना मुंबई पोलिसांनी त्याला नाकाबंदी दरम्यान पिस्टलसह अटक केली आहे. त्याला अटक केल्यानंतर त्याने हत्या केल्याचे उघड झाले आहे. प्रेम प्रकरणातून हत्या झाल्याचा संशय पोलिसांना आहे. मात्र, वंदनावर गोळीबार का करण्यात आला, हा प्रकार रात्री नेमका किती वाजता घडला, याबाबत पोलिस तपास करीत आहेत.

# दोन्ही खेळाडूंना विस्मरणाचा झटका आलाय!

## » नितीशकुमार आणि भाजप नेत्यावर संजय राऊताची टीका

। पुणे । महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**नितीश कुमार यांनी राजदबरोबरची महाआघाडी तोडून बिहारमध्ये भाजपाबरोबर एनडीएचं सरकार स्थापन केले आहे.नितीश कुमार यांनी रविवारी दुपारी राजभवनात राज्यपाल राजेंद्र आर्लेकर यांच्याकडे मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा सुपूर्द केला.त्यानंतर काही तासात नितीश कुमार यांनी मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. यावरून विरोधकांनी नितीश कुमार यांच्यावर टीका करण्यास सुरुवात केली. त्या सर्व घडामोडी दरम्यान ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत हे पुणे दौऱ्यावर कबड्डी स्पर्धेच्या उदघाटन कार्यक्रमाला आले होते.**



इंडिया आघाडीमध्ये नितीश कुमार यांच नाव आघाडीवर होते. पण याच नितीश कुमार यांना भाजप सोबत घेऊन गेली आहे. त्या प्रश्नावर ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत म्हणाले की, तुमच्याकडे चुकीची माहिती आहे.भाजपने काही दिवसापूर्वीच सांगितले होते की, नितीश कुमार आमच्या दारात हात जोडत आले. तर भाजप किंवा एनडीएमध्ये घेणार नाही. अशा प्रकारची भूमिका भाजपकडून मांडण्यात आली होती.एकवेळ मरण पत्करण, पण भाजपच्या दारात जाणार नसल्याची भूमिका नितीश कुमार यांनी देखील मांडली होती. या भूमिका पाहिल्यावर दोन्ही खेळाडूंची मानसिक स्थिती बरोबर नाही.तसेच या दोन्ही खेळाडूंना विस्मरणाचा झटका आलाय,त्यामुळे त्यांनी खेळ खेळू नये,असे सांगत बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि भाजप नेत्यावर त्यांनी टीका केली.तसेच ते पुढे म्हणाले की, कबड्डी हा खेळ हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा आवडता खेळ होता.तसेच शरद पवार यांनी देखील कबड्डी आणि कुस्ती क्षेत्रात मोठ काम केले आहे. शिवसेना असेल किंवा पवार साहेबांचा संघ असेल, काँग्रेसचा संघ असेल निवडणुका आल्यावर,या महाराष्ट्रामध्ये मैदान कोण मारणार,तर २०२४ च मैदान आम्हीच मारणार आणि त्याही पुढच मैदान आम्हीच मारणार, तसेच आम्ही पुढील संघ केव्हा मैदानात येतोय याची वाट पाहतोय.मात्र ते समोर येण्याच टाळत आहे. महापालिका निवडणुका घ्या ना, आम्ही मैदानात उभेच आहोत, तुम्ही कधी या,अशी भूमिका मांडत महायुतीवर त्यांनी निशाणा साधला. तसेच ते पुढे म्हणाले की, कबड्डी खेळात खिलाडूवृत्ती पाहण्यास मिळते. पण सध्याच्या राजकारणामधून खिलाडूवृत्ती संपवलेली आहे. हार जीत होत असते.पण आजच्या सारख सुडाच, बदला घेण्याच राजकारण अशा प्रकारच राजकारण महाराष्ट्रामध्ये कधीच

### आमच्या दारात हात जोडत आले

» इंडिया आघाडीमध्ये नितीश कुमार यांच नाव आघाडीवर होते.पण याच नितीश कुमार यांना भाजप सोबत घेऊन गेली आहे.त्या प्रश्नावर ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत म्हणाले की, तुमच्याकडे चुकीची माहिती आहे.भाजपने काही दिवसापूर्वीच सांगितले होते की, नितीश कुमार आमच्या दारात हात जोडत आले.तर भाजप किंवा एनडीएमध्ये घेणार नाही. अशा प्रकारची भूमिका भाजपकडून मांडण्यात आली होती. एकवेळ मरण पत्करण, पण भाजपच्या दारात जाणार नसल्याची भूमिका नितीश कुमार यांनी देखील मांडली होती.या भूमिका पाहिल्यावर दोन्ही खेळाडूंची मानसिक स्थिती बरोबर नाही.तसेच या दोन्ही खेळाडूंना विस्मरणाचा झटका आलाय,त्यामुळे त्यांनी खेळ खेळू नये,असे सांगत बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार आणि भाजप नेत्यावर त्यांनी टीका केली. तसेच ते पुढे म्हणाले की, कबड्डी हा खेळ हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा आवडता खेळ होता.

घडल नव्हत, अशी भूमिका मांडत पुन्हा एकदा भाजप नेत्यावर त्यांनी टीका केली.स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याबद्दल एमआयएम चे खासदार इम्तियाज जलील यांनी वादग्रस्त विधान केले आहे. त्याबद्दल संजय राऊत यांना विचारले असता ते म्हणाले की, इम्तियाज जलील आणि भाजपची हातमिळवणी आहे.त्यांनी बोलायच (इम्तियाज जलील) भाजपने प्रश्न विचारायचे,तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी हे चार दिवसापूर्वी नाशिक येथे आले होते. तर उद्धव ठाकरे हे स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या घरी जाऊन आले.तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यावेळी जाऊन यायला हवे होते.त्याच बरोबर आम्ही २६ जानेवारी रोजी वाट पाहत होतो की,स्वातंत्र्यवीर सावरकर यांना भारतरत्न पुरस्कार जाहीर होईल. पण यंदाचा भारतरत्न बिहारचे माजी मुख्यमंत्री कर्पूरी ठाकुर यांना जाहीर करण्यात आला. असे सांगत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर निशाणा साधला. भाजपने काही दिवसापूर्वीच सांगितले होते की, नितीश कुमार आमच्या दारात हात जोडत आले

# राजकारणामध्ये निष्ठा, विचारांना अर्थ नाही : राजू शेट्टी

## » तरुणांनी देशात लोकशाही टिकवण्यासाठी राजकारणात यावे

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**सध्याच्या राजकारणामध्ये निष्ठा आणि विचारांना अर्थ राहिलेला नाही. गुंडगिरी आणि भ्रष्टाचार वाढीला लागला आहे, असे मत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष, माजी खासदार राजू शेट्टी यांनी व्यक्त केले. राजकारणापासून दूर राहणाऱ्या तरुणांनी देशात लोकशाही टिकवण्यासाठी राजकारणात यावे, सुशिक्षित तरुण राजकारणात आला तर देशाला समर्थ नेतृत्व मिळू शकेल, असेही त्यांनी सांगितले.**



जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटतर्फे आयोजित सातव्या युवा संसदेच्या उद्घाटनावेळी राजू शेट्टी बोलत होते. संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुधाकर जाधवर, उपाध्यक्ष व युवा संसदेचे अध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर उपस्थित होते. याच कार्यक्रमात संजय जाधव, ओमराजे निंबाळकर यांना आदर्श खासदार पुरस्कार, माजी नगरसेवक साईनाथ बाबर यांना आदर्श नगरसेवक पुरस्कार, सरपंच दिलीप घोलप यांना आदर्श सरपंच पुरस्कार, तर उद्योजक सनी निम्हण यांना आदर्श युवक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.राजू शेट्टी म्हणाले, तरुणांनी राजकारणात येण्यापूर्वी आपण राजकारणात कशासाठी येणार आहोत, हे उद्दिष्ट निश्चित करावे. राजकारण म्हणजे केवळ पैसा प्रसिद्धी सत्ता

### गुंडगिरी आणि भ्रष्टाचार वाढीला

» निष्ठाहीन लोकांनी भरलेल्या आजच्या राजकारणामध्ये जर तरुणांना यावेसे वाटले तर त्यांनी कोणाकडे पहावे? असा प्रश्न आहे. परंतु राजकारण वाईट आहे असे समजून त्यापासून दूर राहू नका. तर ते वाईट राजकारण चांगले करण्यासाठी सकारात्मक विचारांचे सुशिक्षित तरुण राजकारणामध्ये आले पाहिजे. जर सुशिक्षित तरुण राजकारणामध्ये आले नाहीत तर या देशावर एक दिवस निश्चितच हुकूमशाही येईल, असे संजय जाधव यांनी सांगितले.सध्याच्या राजकारणामध्ये निष्ठा आणि विचारांना अर्थ राहिलेला नाही. गुंडगिरी आणि भ्रष्टाचार वाढीला लागला आहे, असे मत स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष, माजी खासदार

मिळवण्याचे साधन नाही तर ते समाजाची सेवा करण्याची एक संधी आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. राजकारण जर सकारात्मकतेने केले तर जनता निश्चितच आपल्या पाठीशी उभी राहते हे मी वैयक्तिक अनुभवातून आपल्याला सांगतो. राजकारणामध्ये अनेक समस्या असल्या तरी या देशाला हुकूमशाहीपेक्षा लोकशाहीच पुढे नेऊ शकते. त्यामुळे या देशातील लोकशाही टिकवण्यासाठी तरुणांनी राजकारणात आले पाहिजे.

# शहरात अवजड कोंडी!

## मनाई आदेशाची पायमल्ली : अपघाताच्या घटनांमध्ये वाढ, नागरिक त्रस्त

**। पिंपरी ।महाईन्यूज । प्रतिनिधी।**

**वाहतूक कोंडी टाळण्यासह अपघाताच्या घटना रोखण्यासाठी शहरातील बहुतांश रस्त्यांवरून सकाळी व सायंकाळी पिंपरी-चिंचवड वाहतूक शाखेने जड, अवजड वाहनांना प्रवेश मनाई केली आहे. तरीही शहरातील अनेक रस्त्यांवरून सकाळ, सायंकाळी गर्दीच्या वेळी जड, अवजड वाहने सुसाट धावत आहेत. त्यामुळे, अपघाताच्या घटना वाढत असून त्यामध्ये अनेकांना जीव गमवावा लागला आहे.**




"शहरातील वर्दळीच्या परिसरामध्ये सकाळी व सायंकाळी जड, अवजड वाहनांना प्रवेश बंदी आहे. मात्र, तरीही ही वाहने धावत असल्यास त्यावर कारवाई केली जाईल. याबाबत अधिकाऱ्यांनाही सूचना दिल्या जातील.

**-विवेक पाटील,** पोलिस उपायुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड.

अवजड वाहनांमुळे वाहतूकची कोंडी होऊन दूरपर्यंत वाहनांच्या रांगा लागतात. यावर उपाय म्हणून वाहतूक पोलिस शाखेने आयुक्तालयाच्या हद्दीतील विविध मार्गांवर सकाळी आठ ते अकरा व सायंकाळी पाच ते नऊ यावेळेत अवजड वाहनांना प्रवेश बंदी केली आहे. मात्र, प्रतिबंधित वेळेतही जड वाहने धावत असून यामध्ये मोठे ट्रक, ट्रेलर यासह इतर जड वाहनांचा समावेश असतो. या वाहनांवर कडक कारवाईची मागणी होत आहे.

### अवजड वाहनांना प्रवेश मनाई असलेले मार्ग

तळवडे परिसर : त्रिवेणीनगर ते तळवडे गावठाण ते आयटी पार्क चौक ते महिंद्रा कंपनी, परंडवाल चौक, खंडेलवाल चौक आयटी पार्क चौक तळवडे गावठाण, चिखली गावठाण, डायमंड चौक, रामकृष्णहरी चौक, डायमंड चौक ते कुदळवाडी पूल, कृष्णा चौक, साने चौक नेवाळे वस्ती, पिंगळे चौक-सोनवणे वस्ती- ज्योतिबानगर चौक. निगडी परिसर : भक्ती-शक्ती चौक ते त्रिवेणीनगर चौक, तळवडे रस्ता, थरमॅक्स चौक ते खंडोबा माळ चौक, चिखली पोलिस ठाणे ते शाहूनगर ते केएसबी चौक, डी.वाय पाटील कॉलेज ते हँगिंग ब्रिज, छत्रपती संभाजी महाराज चौक ते खंडोबामाळ चौक, चिंचवड परिसर : रिव्हर व्ह्यू चौक ते महावीर चौक, छत्रपती महाराज चौक, खंडोबामाळ ते दळवीनगर, एसकेएफ कंपनी, चापेकर चौक, भोसरी परिसर: भोसरी उड्डाणपूल परिसर, जय भारत चौक ते बनाचा ओढा, नाशिक फाटा ते हॅरिस ब्रीज, हिंजवडी परिसर, वाकड पूल व वाकड नाका ते इंडियन ऑइल चौक, मुंबई-बंगळूरु महामार्गावरून मायकार शोरुम ते हिंजवडी आयटी पार्ककडे जाणारा मार्ग, साखरे पाटील टी जंक्शन चौक ते विप्रो सर्कल फेज- १, टी जंक्शन फेज-३ ते टाटा टी जंक्शन, सांगवी परिसर : रक्षक चौक ते काळेवाडी फाटा उड्डाणपूल, काळेवाडी फाटा ते तापकीर चौक मार्गे एम.एम.चौक, एम्पायर इस्टेट, म्हसोबा चौक ते पिंपळे गुरवकडे जाणारा मार्ग. वाकड परिसर: वाकड नाका ते कस्पटे चौक, बिर्ला हॉस्पिटल ते भुमकर चौक, जिगर हॉटेल येथून सेवा रस्त्याने भुमकर चौकाकडे जाणारा मार्ग, शनि मंदिर येथून सेवा रस्त्याने भुमकर चौक, वाकड गाव चौक ते दत्त मंदिर रस्ता, तापकीर चौक ते थेरगाव फाटा, ताथवडे व पुनावळे अंडरपास मार्गे जाणारा मार्ग, पिंपरी परिसर : पिंपरी चौक ते शगुन चौक, भाटनगर कॉर्नर ते मुख्य बाजार मार्ग, शगुन चौक ते साई चौक, आर्य समाज चौक ते कराची चौक, शगुन चौक ते डिलक्स चौक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग, भाटनगर. देहूरोड परिसर : स्वामी चौक ते देहूरोड बाजार, सवाना चौक ते देहूरोड बाजार, मुकाई चौक ते रावेत.

---

# 'गुणवत्ता' हाच क्रीडा क्षेत्रातील यशाचा कानमंत्र!

## सुबेदार सुखमीत सिंग : डी.एस. के. कुंजबन सोसायटीमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात

**। पिंपरी। प्रतिनिधी : महाईन्यूज**

**क्रीडा क्षेत्रात कोणताही गरीब- श्रीमंत, जाती-धर्माचा विचार केला जात नाही. गुणवत्ता हाच क्रीडा क्षेत्रात यश मिळवण्याचा कानमंत्र आहे. त्यासाठी युवा पिढीने जिद्द आणि चिकाटी जोपासली पाहिजे, असे मत सुबेदार सुखमीत सिंग यांनी व्यक्त केले. पुनावळे येथील डी.एस. के. कुंजबन सोसायटीमध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सुबेदार सिंग बोलत होते.**





यावेळी सोसायटीचे चेअरमन योगेश सूर्यवंशी, सांस्कृतिक समितीचे प्रमुख युवराज पाटील, कार्यकारी समितीचे अधिकराव दिवे-पाटील, अभिजित वाळवेकर, संजय पाटील, अमेय लाटकर, विजय कांबळे आदी उपस्थित होते. भारतमाता आणि महामानवांची प्रतिमा पूजन करून कार्यक्रामची सुरवात झाली. त्यानंतर सुरक्षा विभागाकडून ध्वजसलामी करण्यात आली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. सुरक्षा व व्यवस्थापन विभागाचे श्रीधर पन्हाळकर, मेहताब मोमीन आणि सहकारी यांनी आयोजनमध्ये सर्वोतोपरी सहकार्य केले.



### विविध स्पर्धांचे पारितोषिक वितरण...

प्रजासत्ताक दिनानिमित्त यावर्षी सोसायटीअंतर्गत वक्तृत्व स्पर्धा, हस्ताक्षर स्पर्धा आणि गायन स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धेतील विजेत्यांना सन्मान चिन्ह व प्रशिस्तीपत्र प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. तसेच, डॉ. प्रज्ञा पाटील यांना वैद्यकीय व सोसायटीतील विशेष योगदानबाबत "सन्मानचिन्ह" देऊन गौरविण्यात आले. सांस्कृतिक समितीच्या सुप्रिया लाटकर, प्रज्ञा पाटील, प्रियांका दिवे- पाटील, स्वप्नाली कुलकर्णी, ऋतुजा कांबळे, नेहा वाळवेकर, दीप्ती पाटील, कस्तुरी केदारी, कविता पाटील यांनी योगदान दिले. मनिषा कुलकर्णी, रोहिनी सबने, लीना जाधव यांनी परीक्षक म्हणून कामकाज पाहिले.




# संसद आवडे सर्वांना..!

**ल्युटन्स दिल्लीमध्ये राजकारण्यांचा उच्छाद बाजूला केला तर फक्त दोन गोष्टींचा त्रास असतो. डास आणि माकडं. 'जी-२०'ची शिखर परिषद झाली, तेव्हा दिल्लीच्या स्थानिक प्रशासनाला सर्वाधिक काळजी या दोघांची होती. डासांनी आणि माकडांनी गडबड केली तर काय, या भीतीने प्रशासनाने 'बंदोबस्त' वाढवला होता.**

ही नाकाबंदी तात्पुरती होती. डास आणि माकडं येणारच. संसदेला लागून असलेल्या रेडक्रॉस रोडवर माकडांना बागडायला नवा नवा रस्ता मिळाला आहे. हा रस्ता संसदेला लागून आहे, नव्या इमारतीचं बांधकाम सुरू असल्याने हा रस्ता दोन वर्ष बंद होता. इथल्या पादचारी मार्गावर चहाच्या दोन टपऱ्या आहेत. मझार आहे. रेडक्रॉस सोसायटी आहे. या सगळ्या परिसरात माकडांची सत्ता असते. ही माकडं रेडक्रॉस सोसायटीच्या एका सुरक्षारक्षकाला मात्र घाबरतात असं दिसलं. हा सुरक्षारक्षक सोसायटीच्या लोखंडी दारावर दंडुका असा बडवतो की माकडांची चिल्लीपिल्ली, त्यांचे आई-बाप जीव तोडून पळतात. खरंतर या माकडांना हाकलून काही फायदा नसतो. संसदेच्या परिसरात ती फिरत राहतात. मग त्यांच्याकडं हनुमानाचं रूप म्हणून पाहून ही हनुमानाची टोळी संसदेची सुरक्षा करत आहे, असं मानायला काय हरकत आहे? या 'हनुमाना'च्या टोळीतील



काही सदस्य संसदेतही पाहायला मिळतात. नव्या इमारतीत त्यांना आतमध्ये येण्याची संधी मिळत नाही. तिथं वेगळीच मंडळी असतात. जुन्या इमारतीत आता कोणी नसतं. तिथं पूर्ण शांतता असते. ही माकडं निवांत दुपारचं ऊन खात बसलेली असतात. त्यांच्या जोडीला सांद्रीत कबुतरं बसलेली असतात. ही कबुतरं म्हणजे राजकारण्यांचे जणू अस्वस्थ आत्मेच, अशी गम्मत-जम्मत पत्रकार नेहमीच करतात. संसदेत फक्त अव्वल दर्जाचे अभिनेते, कथित चाणक्य, धुरंधरच असतात असं नव्हे प्राणीमात्रांनाही संसदेचा परिसर आवडतो. वर्षानुवर्षे राजकारणी इथं रमतात, तसंच प्राणीमात्रही आपलंच घर म्हणून इथं वावरतात. कॉँग्रेसचे माजी अध्यक्ष राहुल गांधी यांच्या 'भारत जोडो न्याय' यात्रेत आसाममध्ये अडथळे निर्माण झाले होते. राहुल गांधी आणि त्यांचे अत्यंत विश्वासू के. बी. बायजू यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यात्रेच्या आयोजनाची मुख्य जबाबदारी बायजूंकडे आहे. आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्वा-शर्मा यांनी वैयक्तिक हेत्वारोपामुळे ही यात्रा 'प्रकाशझोतात' राहील याची सोय करून टाकली. पण, त्यानिमित्ताने बायजूंकडे पुन्हा लक्ष वेधले गेले. गुलाम नबी आझाद यांनी कॉँग्रेसला सोडचिठ्ठी देताना राहुल गांधींवर खरमरीत टीका केली होती. सोनिया गांधींना लिहिलेल्या पत्रामध्ये राहुल गांधींचे 'स्वीय सचिव आणि सुरक्षारक्षक' पक्षामध्ये महत्त्वाचे निर्णय घेत असल्याचा आरोप केला होता. हे आरोप झालेले सुरक्षारक्षक म्हणजे के. बी. बायजू. कधीकाळी बायजू हे राहुल गांधींना दिलेल्या एसपीजी सुरक्षेचे भाग होते. तिथंच दोघांचं ट्युनिंग जमलं. आता, बायजू हे राहुल गांधींच्या चमूतील अविभाज्य घटक आहेत. असं म्हणतात की, त्यांची मैत्री इतकी घट्ट आहे की, कोणत्याही आरोपाचा आणि टीकेचा त्यांच्यावर काहीही परिणाम झालेला नाही. पहिल्या 'भारत जोडो' यात्रेमध्येही बायजूंचा महत्त्वाचा सहभाग होता. राहुल गांधींच्या निकटवर्तीयांच्या वर्तुळात बायजूंचे स्थान काय याची माहिती असणारे काही होतकरू कॉँग्रेस कार्यकर्ते बायजूंच्या भोवती घोटाळताना दिसत होते. बायजूच नव्हे इतरही निकटवर्तीय अजून 'टीम राहुल'मध्ये टिकून आहेत. राहुल गांधींच्या वर्तुळातील अलंकार सवाईही यात्रेमध्ये त्यांच्यासोबत होते. यात्रेमध्ये छोट्या अपघातात एक पोलीस जखमी झाला होता. राहुल गांधींच्या ताफ्यातील रुग्णवाहिका त्यांची परवानगी मिळाल्यानंतर पोलिसाला घेऊन गेली होती. दिग्विजय सिंह यांनी स्वत: अलंकार यांना फोन करून ही परवानगी घेतली होती. 'ईडी'च्या ससेमिऱ्यामुळे अलंकारही चर्चेत आले होते. सचिन राव आता कॉँग्रेसचे मुखपत्र 'संदेश'ची जबाबदारी सांभाळतात. प्रवीण चक्रवर्ती यांना संशोधन विभागाची जबाबदारी देण्यात आली होती, आता त्यांना प्रोफेशनल कॉँग्रेसचे अध्यक्ष केले आहे. के. सी. वेणुगोपाल, रणदीप सुरजेवाला, अजय माकन यांनी तर थेट संघटनेमध्ये मोठ्या पदांवर पकड मिळवली आहे. के. राजू हे अनुसूचित जाती-जमाती, ओबीसी, अल्पसंख्याक विभागाचे राष्ट्रीय समन्वयक आहेत.

## संपादकीय »

# अधिसूचनेचा अर्धानंद!

***मराठा आंदोलनाच्या या यशाचा प्रतिवाद आता 'ओबीसी' आंदोलनाने होणार हे उघड आहे. असेच मुंबईच्या वेशीवर धडकल्यास आश्चर्य वाटू नये.***

मराठा आरक्षणासाठी गेले काही महिने सुरू असलेले आंदोलन मुंबईच्या वेशीवर धडकल्यावर या आंदोलनावर तोडगा निघाला असे 'दाखवणे' आवश्यक होतेच. ती आवश्यकता सरकार आणि आंदोलक या दोघांसही होती. त्यासाठी आंदोलनकर्ते आणि सरकार या दोघांस उभय बाजूंनी मंजूर होईल अशा मध्यममार्गाची गरज होती. कारण या आंदोलकांचा मुंबई प्रवेश सरकार आणि मुंबई महानगरी या दोघांस पेलला नसता आणि पुन्हा मुंबईत ठिय्या देऊन बसण्याचे आव्हान आंदोलकांसमोर होते. हे वास्तव. त्याची जाणीव उभयतांस होती तरीही आंदोलन मागे घ्यावयाचे तर आंदोलकांचा विजय झाला असे दाखवता येणे आवश्यक होते आणि त्याचवेळी सरकारलाही विजयाचा आनंद मिरवता येणे गरजेचे होते. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी हे विजय-विजय खेळाचे सादरीकरण उत्तमपणे केले. नेपथ्य तयार होतेच.

**संविधानाची मूलभूत रचना किंवा वैशिष्ट्ये बदलता येणार नाहीत, हे सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी स्पष्ट केले असले तरीही त्याकडे दुर्लक्ष करून केंद्र सरकार 'संघराज्य' या रचनेची करत असलेली मोडतोड अत्यंत घातक आहे..**

# राज्यांचे नव्हे,नगरपालिकांचे संघराज्य!

भारत हे संघराज्य आहे या वादातीत मुद्द्यावर मी या स्तंभातील आजच्या लेखाची सुरुवात करतो आहे. भारतातील राज्ये (जम्मू आणि काश्मीर वगळून) ही भारतीय राज्यघटनेच्या पहिल्या अनुसूचीमध्ये सूचिबद्ध आहेत. ब्रिटिश शासित प्रांतांनी आणि संस्थानिकांनी या संघराज्यात सहभागी होण्यासाठी स्वेच्छेने संमती दिली हे संघराज्यवादाचे सार आहे. भाषिक मुद्द्यावर राज्यांची पुनर्रचना करण्यात आली कारण राज्य हा केवळ प्रशासकीय घटक नाही; तर त्याची भाषिक, सांस्कृतिक, ऐतिहासिक आणि राजकीय ओळख आहे.आपण किती संघराज्यात आहोत यावर काथ्याकूट करता येईल, पण भारत एक संघराज्यीय राष्ट्र आहे. संविधानातील काही तरतुदींमुळे संघराज्यीय अधिकार व्यापक आहेत तर काही तरतुदींमुळे ते आकुंचित पावले आहेत. पण संविधान तयार करत असताना भारत पूर्णपणे संघराज्यीय असेल अशी कल्पना केली होती असे मानून काही हाती लागणार



नाही. या युक्तिवादाला बळकटी देण्यासाठी, मी अनुच्छेद ३६८(२) चा संदर्भ देतो. या कलमानुसार संसदेने केलेल्या घटनेतील काही दुरुस्त्या या संबंधित विधेयकाचे कायद्यात रूपांतर होण्याआधी निम्म्या राज्यांच्या विधानसभांनी मंजूर करणे आवश्यक आहे.केशवानंद भारती, एस. आर. बोम्मई आणि इतर प्रकरणांमध्ये सर्वोच्च न्यायालयाने सांगितले की 'संघराज्यवाद' हे संविधानाचे मूलभूत वैशिष्ट्य आहे. हा संघराज्यवादाचा विजय होता. असे असले तरी न्यायालयाला न जुमानता, केंद्र सरकारने संघराज्यवादापासून दूर राहण्याचे मार्ग शोधले आहेत. राज्यांना अंमलबजावणी करण्याचे, कायदे करण्याचे आणि आर्थिक पातळीवरचे अधिकार आहेत. भाजप सरकारने या अधिकारांची कशी गळचेपी केली ते पाहू.अनुच्छेद १५४ आणि १६२ अंतर्गत, राज्याला कार्यकारी अधिकार आहेत आणि ते सर्व राज्य विधानमंडळाला ज्या ज्या गोष्टींशी संबंधित कायदे करण्याचा अधिकार आहेत, त्या सर्व गोष्टींशी संबंधित आहेत. पोलीस हा राज्याचा विषय आहे. डीजीपीं (कायदा व सुव्यवस्था)ची नियुक्ती राज्य सरकार करते. असे असले तरी राज्याला पात्र आयपीएस अधिकाऱ्यांची नावे यूपीएससीकडे सादर करायला सांगून आणि यूपीएससीने निवडलेल्या तीन अधिकाऱ्यांमधूनच राज्यासाठी आयपीएस अधिकाऱ्यांची निवड करण्याची तथाकथित 'मुभा' देऊन केंद्र सरकारने ते अधिकार बळकावले आहेत. 'नीट' ची परीक्षा हे आणखी एक उदाहरण. ही परीक्षा सुरू करून, केंद्राने राज्यांना वैद्यकीय महाविद्यालयांमध्ये (ही महाविद्यालये राज्य सरकारच्या अखत्यारीतील आहेत .

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।  
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।  
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**


**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# ओबीसीचा घास हिरावण्याचा प्रयत्न!

## सगेसोयरे मसुद्यावर लाखोंच्या हरकती नोंदवा : भुजबळ

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मराठा समाजाच्या मोर्चानंतर (MARATHA RESERVATION MORCHA) ओबीसी संघटनांनी आंदोलनात्मक पवित्रा घेतला आहे. ज्यांची कुणबी नोंद आहे, त्यांना प्रमाणपत्र देण्यास विरोध नव्हता. आता मात्र ओबीसी लेकरांच्या तोंडाचा घास पळविण्यात आला असल्याचा आरोप राज्याचे मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि ओबीसी नेते छगन भुजबळ यांनी केला आहे. सगेसोयरे मसुद्याच्या विरोधात लाखोंच्या संख्येने हरकती नोंदवण्याचे आवाहनही यावेळी भुजबळांनी केले.**



मुंबईत भुजबळ यांच्या उपस्थितीत विविध ओबीसी संघटनांची बैठक पार पडली. या बैठकीनंतर आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत भुजबळांनी बैठकीतील निर्णय आणि ओबीसी संघटनांची भूमिका स्पष्ट केली. छगन भुजबळ यांनी म्हटले की, मराठा समाजाला वेगळं आरक्षण द्यायला आमचा विरोध नव्हता मात्र आता भटक्यांचा घास काढून घेतला जात आहे. ओबीसींसाठीचे 27 टक्के आरक्षण आम्हाला पूर्णपणे मिळालं नाही.

अनेक ठिकाणी मराठा समाजाला मोठ्या प्रमाणात नोकऱ्या मिळाल्या आहेत. खुल्या प्रवर्गातून मराठा समाज पुढे गेला आहे. कुणबी प्रमाणपत्र आहेत त्यांच्याबाबत आम्हाला काहीचं म्हणण नाही. ज्यांना ओबीसी प्रमाणपत्र हवं असतं त्या लोकांनी ती प्रमाणपत्र घेतली आहे. तरी सुद्धा निजामशही काळात नोंद आहे म्हणून पुन्हा शोध घ्या अशी मागणी करण्यात आली. यासाठी वेगवेगळे जीआर काढण्यात आले. सगेसोयरे आदेश काढण्यात आला. 54 लाख नोंदी सापडल्या असं सांगितलं आहे. प्रमाणपत्र देण्यासाठी यासाठी अधिकारी फौजफाटा करण्यात आला. ओबीसी लेकरांच्या तोंडाचा घास पळविण्यात आला असल्याचा आरोप भुजबळ यांनी केला. आज झालेल्या ओबीसी संघटनांच्या बैठकीत राज्य सरकारने सगेसोयरे याची व्याख्या बदलावी अशी मागणी करण्यात आली. सगेसोयरे मसुद्यामुळे ओबीसी समाजात भीतीचे वातावरण असल्याचे भुजबळांनी सांगितले. त्याशिवाय, सरकार नियुक्त न्यायमूर्ती संदीप शिंदे समिती असंविधानिक आहे. कुणबी मराठा प्रमाणपत्राला स्थगिती द्यावी अशी मागणीदेखील करण्यात आली. आजच्या बैठकीत तीन ठराव करण्यात आल्याची माहिती भुजबळ यांनी दिली. सुनिल शुक्रे, जाधव यांच्या मागासवर्गीय आयोगावर नियुक्त्या केल्या ह्या चुकीच्या आहेत. शिंदे समिती आणि मागासवर्गीय आयोग यांची निवड रद्द करावी असा ठराव करण्यात आला.

त्याशिवाय, 1 तारखेला आमदार, खासदार आणि तहसीलदार यांच्याकडे ओबीसी आरक्षण वाचवण्यासाठीचे निवेदन देण्याची कृती करण्याची हाक देणारा ठराव मांडण्यात आला. लाखोंच्या संख्येने सर्वांनी बाहेर पडायला हवं. राजकिय नेत्यांना कळायला हवं की आमची त्यांना गरज आहे हे अधोरेखित करण्याची आवश्यकता असल्याचेही त्यांनी म्हटले. तर, 16 फेब्रुवारीपर्यंत सगेसोयरे मसुदा पाठवला आहे.त्यावर हरकती लाखोंच्या संख्येनं पाठवा असे आवाहनही करण्यात आले आहे. त्याशिवाय, 3 फेब्रुवारी रोजी ओबीसी मेळावा अहमदनगरला आयोजित केला आहे. या आंदोलनाला वकिल, शिक्षक साहित्यिक यांनी सहकार्य करावं असे आवाहनही भुजबळ यांनी केले. ओबीसींची महाराष्ट्र यात्रा काढण्यात येणार असून त्याची सुरुवात मराठवाड्यातून होणार आहे. या आंदोलनात अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांनीदेखील एकत्र यावं असे आवाहन भुजबळ यांनी केले आहे.

### एकनाथ शिंदे यांच्यावर गंभीर आरोप

» केवळ मला सुरुवातीच्या एकाच निर्णयात विश्वासात घेतलं त्यानंतर मला कोणत्याही निर्णयात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विश्वासात घेतलं नाही. मी केवळ मागचा काही दिवसांपासून जे निर्णय घेतले जात आहे ते पाहत असल्याचे त्यांनी म्हटले. ओबीसी समुदायात बॅकडोअर एन्ट्री करण्याचे काम सध्या सुरू आहे. ओबीसी समाजाला धक्का लागणार नाहीं असं सांगण्यात येत आहे. प्रत्यक्षात मात्र बॅक डोअर एंट्री सुरू झाली असल्याचे त्यांनी म्हटले. मुंबईत भुजबळ यांच्या उपस्थितीत विविध ओबीसी संघटनांची बैठक पार पडली. या बैठकीनंतर आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत भुजबळांनी बैठकीतील निर्णय आणि ओबीसी संघटनांची भूमिका स्पष्ट केली. छगन भुजबळ यांनी म्हटले की, मराठा समाजाला वेगळं आरक्षण द्यायला आमचा विरोध नव्हता मात्र आता भटक्यांचा घास काढून घेतला जात आहे. ओबीसींसाठीचे 27 टक्के आरक्षण आम्हाला पूर्णपणे मिळालं नाही. अनेक ठिकाणी मराठा समाजाला मोठ्या प्रमाणात नोकऱ्या मिळाल्या आहेत. खुल्या प्रवर्गातून मराठा समाज पुढे गेला आहे. कुणबी प्रमाणपत्र आहेत त्यांच्याबाबत आम्हाला काहीचं म्हणण नाही. ज्यांना ओबीसी प्रमाणपत्र हवं असतं त्या लोकांनी ती प्रमाणपत्र घेतली आहे.

# काँग्रेसच्या ताठरपणामुळे आघाडीचे भवितव्य संपुष्टात

## एका म्यानात दोन तलवारी ठेवण्याचे काम : प्रकाश आंबेडकर

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आरक्षण मोर्चाचा फायदा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना होणार असून हीच हवा राहिली तर या लोकप्रियतेचे रूपांतर मतात होईल असे वंचित बहुजन आघाडीचे अध्यक्ष प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले. आंबेडकर यांनी भाष्य केले. सरकारने घेतलेल्या निर्णयाचे विश्लेषण करताना आंबेडकर यांनी म्हटले की, फायदा जरी शिंदे गटाला होत असला तरी भाजप पासून मात्र मराठा आणि ओबीसी हे दोन्ही समाज दूर गेले असल्याची स्थिती आहे.**



माढा येथे ओबीसी महासंघाच्या कार्यक्रमासाठी प्रकाश आंबेडकर आले होते. त्यावेळी आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले की, मराठा समाजाने मनोज जरांगे यांच्या नेतृत्वात आंदोलनाद्वारे ज्या मागण्या केल्या त्या मान्य करत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हेच आता स्ट्राँग मराठा लीडर म्हणून पुढे आले आहेत. शिंदेंच्या भूमिकेमुळे इतर मराठा नेते हे क्लीन बोल्ड झाले असल्याचे आंबेडकर यांनी सांगितले. काँग्रेसच्या ताठरपणामुळे इंडिया आघाडीचे राष्ट्रीय पातळीवरचे भवितव्य संपले असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले.यावेळी ते म्हणाले की, काँग्रेस पक्ष एका म्यानात दोन तलवारी ठेवण्याचे काम करतोय. एकीकडे राहुल गांधीमार्फत पक्ष वाढविण्याचे काम चालू आहे. दुसरीकडे इंडिया आघाडीतून काँग्रेसचे अध्यक्ष खरगे यांना पुढे करण्याचे काम चालू आहे. भारत जोडो यात्रा पश्चिम बंगाल, बिहार या ठिकाणाहून जाणार आहे. या ठिकाणी प्रमुख असलेले तृणमूल काँग्रेस आणि जेडीयू यांना सामावून घेतले जात नाही. याच ठिकाणी पक्ष वाढीचा कार्यक्रम हाती घेऊन काँग्रेस इंडिया आघाडीतील प्रमुख पक्षांना राजकीयरित्या धमकावण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप आंबेडकर यांनी केला.काँग्रेसच्या अशा भूमिकेमुळेच केजरीवाल, ममता बॅनर्जी आणि आता नितीशकुमार यांनी वेगळी वाट धरली आहे त्यामुळे राष्ट्रीय पातळीवर इंडिया आघाडीचे भवितव्य संपले असल्याची टीका त्यांनी केली.महाराष्ट्रात महाविकास आघाडीकडून 30 जानेवारीला चर्चेचे निमंत्रण आम्हाला मिळाले असून त्या चर्चेसाठी जाऊन आम्ही आमचे मुद्दे मांडू. काही मुद्द्यांवर मतभेद असतील तर ते चर्चेतून दूर करण्याचा प्रयत्न करु.

### 30 जानेवारीला चर्चेचे निमंत्रण

» राष्ट्रीय पातळीवर इंडिया आघाडीचे जे झाले ते महाविकास आघाडीत व आमच्यात होऊ नये यासाठी प्रयत्न करु असे आंबेडकर म्हणाले. गेल्या काही महिन्यांपासून ओबीसी आणि मराठा समाजात दरी निर्माण झाली आहे. यापुढील काळात ती वाढू नये यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे आंबेडकर यांनी सांगितले. याच ठिकाणी पक्ष वाढीचा कार्यक्रम हाती घेऊन काँग्रेस इंडिया आघाडीतील प्रमुख पक्षांना राजकीयरित्या धमकावण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप आंबेडकर यांनी केला.

# नितीश कुमार पुन्हा मुख्यमंत्री!

## सम्राट चौधरी आणि विजय सिन्हा यांना उपमुख्यमंत्री पदी

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**बिहारच्या मुख्यमंत्रीपदी 9 व्या वेळेस नितीशकुमार (NITISHKUMAR) यांनी शपथ घेतली. भाजपसोबत स्थापन होत असलेल्या या नव्या सरकारचे शिल्पकार महाराष्ट्रातील भाजपचे एक वरिष्ठ नेते आहेत. ज्यांनी मागील दीड वर्ष मेहनत करून जेडीयू-आरजेडीसरकारला सुरुंग लावत भाजप सोबत जेडीयूला घेत नवं सरकारं स्थापन करण्याची मोहीम फत्ते केली. राज्याच्या राजकारणातून राष्ट्रीय राजकारणात गेलेले विनोद तावडे (VINOD TAWDE) यांनी या सत्ताबदलात महत्त्वाची भूमिका बजावली असल्याचे समोर आले आहे.**

दीड वर्षांपूर्वी बिहारमध्ये भाजपला धक्का देत राष्ट्रीय जनता दल आणि जेडीयू यांनी सरकार स्थापन केलं आणि त्यानंतर भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांना बिहार राज्याची जबाबदारी मिळाली. ज्या पद्धतीने भाजपला सत्तेतून बाजूला करण्यात आलं होतं, त्याच पद्धतीने पुन्हा एकदा भाजपला सत्तेत आणण्याची जबाबदारी विनोद तावडे यांच्यावर सोपवण्यात आली होती. बिहारमध्ये जातीय राजकारणात लालूप्रसाद यादव तेजस्वी यादव आणि नितीश कुमार यांचा हातखंडा आहे. त्यामुळे त्यांना शह द्यायचा असेल तर पहिला जातीचा अभ्यास करावा लागेल हे लक्षात घेऊन विनोद तावडे यांनी एक मास्टर प्लॅन रचला आणि दीड वर्षानंतर सत्तेच्या रूपाने तो यशस्वीरित्या तळागाळात रुजल्याचं राजकीय जाणकारांच्या लक्षात आलं आहे. बिहारमध्ये जमीनदार, ओबीसी आणि दलित राजकारण महत्त्वपूर्ण आहे. या राजकारणाला जर शह द्यायचा असेल तर त्यासाठी भाजपमध्ये देखील बदल करावे लागतील याची स्पष्ट सूचना केंद्रीय नेतृत्वाकडे विनोद तावडे यांनी केली. त्यानंतर पक्षाच्या नेतृत्वाने तातडीने विनोद तावडे यांच्या अपेक्षेनुसार राज्यातील महत्त्वाच्या पदांचे वाटप केले, जबाबदारी निश्चित केली. एकीकडे राजकीय फेरबदल करत असताना दुसरीकडे तळागाळातील प्रत्येक मतदार आपल्या सोबत असावा यासाठी पक्षातील पदाधिकाऱ्यांना सातत्याने विविध कार्यक्रम आयोजन करण्याचे आदेश दिले आणि विनोद तावडे स्वतः या कार्यक्रमांवर लक्ष देत होते. त्याशिवाय, स्वतः या प्रत्येक कार्यक्रमांमध्ये उपस्थित राहू लागले. याचाच फायदा भाजपला



नितीश कुमार लालूप्रसाद यादव यांची हक्काची व्होट बँक असणारी आगडा, पिछडा आणि अति पिछडा तोडता आली. या व्होट बँकमध्ये भाजपने शिरकाव केला. लालूप्रसाद यादव हे ज्या समाजातून येतात त्या समाजाला आपल्या सोबत घ्यायचा असेल तर भाजपच त्या समाजाला न्याय देऊ शकतो असा विश्वास निर्माण करण्याची गरज विनोद तावडे यांना वाटली आणि याचसाठी त्यांनी मध्य प्रदेशात मोहन यादव मुख्यमंत्रीपदाची शपथ घेत असताना याचं लाईव्ह चित्रीकरण यादव समाजाला पाहण्यासाठी ठिकठिकाणी बिहार मध्ये उपलब्ध करून दिलं.बिहारचे दोन वेळा मुख्यमंत्री राहिलेले कर्पुरी ठाकूर यांना मरणोत्तर भारतरत्न देणे हे देखील ओबीसीला आपलंसं करण्याचा एक भाग असल्याची सूत्रांची माहिती आहे. भाजपने जातीय गणित जुळवण्यास सुरुवात केली होती त्यामुळे नितीश कुमार यांच्या जनता दल युनायटेड पक्षातील आमदारांना अस्वस्थ वाटू लागलं होतं. जर भाजपने असंच काम सुरू ठेवलं तर आगामी निवडणुकांमध्ये भाजप सत्तेत आल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे आपण आताच सत्तेत सहभागी व्हायला हवं अशी भूमिका घ्यायला सुरुवात केली. याची सुरुवात नितीशकुमार यांचे विश्वासू संजय झा आणि देवेश चंद्र ठाकूर यांनी केली. एकीकडे प्राथमिक चर्चा सुरू असताना दुसरीकडे विनोद तावडे यांनी नितेश कुमार यांची दुखरी नस ओळखून त्यावर काम करायला सुरुवात केलं. लालूप्रसाद यादव यांच्यासोबत जाताना नितीशकुमार यांना 'इंडिया' आघाडीचा चेहरा केला जाईल असं आश्वासन देण्यात आलं होतं. मात्र मल्लिकार्जुन खरगे यांना चेहरा केल्यानंतर नितीशकुमार नाराज असल्याच्या बातम्या येऊ

### नितीश कुमारांचा शपथविधी कार्यक्रम

बिहारमध्ये अभूतपूर्व राजकीय उलथापालथ झाली आहे. मुख्यमंत्री नितीश कुमारांनी राजद-कॉंग्रेससह असलेल्या आघाडीतून बाहेर पडत सरकार पाडले. मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देऊन त्यांनी एनडीएसह सत्तास्थापनेचा दावा केला. भाजपाच्या पाठिंब्याचे पत्र राज्यपालांनी स्वीकारलं असून नितीश कुमारांनी आज २८ जानेवारी रोजी नवव्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. म्हणजे, मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देऊन पुन्हा त्याच दिवशी मुख्यमंत्री पदाची शपथही घेण्याचा विक्रम नितीश कुमारांनी केला. दरम्यान, आज विधिमंडळात नितीश कुमारांनी राजद-कॉंग्रेस सरकारच्या मुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्याची घोषणा केली. त्यानंतर, त्यांनी राज्यपालांकडे जात राजीनामा सुपूर्द केला. राजीनामा दिल्यानंतर भाजपाच्या आमदारांनी त्यांना पाठिंबा जाहीर केला. भाजपाच्या पाठिंब्याचं पत्र राज्यपालांना देत त्यांनी एनडीएकडून सरकार स्थापनेचा प्रस्ताव ठेवला. हा प्रस्ताव राज्यपालांनी स्वीकारून आज राज्यपालांनी मुख्यमंत्र्यांसह आठ मंत्र्यांना मंत्रिपदाची शपथ दिली. नितीश कुमारांनी आतापर्यंत नऊवेळा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली आहे. गेल्या दहा वर्षांत त्यांनी पाचवेळा तर, दोन वर्षांत दोनवेळा मुख्यमंत्री पदाची शपथ घेणारे मुख्यमंत्री ठरले आहेत.

लागल्या होत्या. याचवेळी मास्टर स्ट्रोक खेळताना विनोद तावडे यांनी ऑपरेशन लोटस सुरू केलं आणि आता बिहारमध्ये भाजप सत्तेत येणार आहे. प्रादेशिक पातळीवर संजय झा आणि देवेश चंद्र ठाकूर यांच्या भाजपसोबत सात वेळा बैठका पार पडल्या. अखेर नितीश कुमार यांची जितराम मांझी आणि चिराग पासवान यांना सोबत घेणार नाही या भूमिकेला मवाळ करण्यासाठीं विनोद तावडे आणि नितीश कुमार यांची तीन वेळा बैठक पार पडली आणि त्यानंतर मांझी यांच्या मुलाला महत्त्वाचे पद तर चिराग पासवान यांच्याबाबत लवकरच मार्ग काढण्याचा निर्णय झाला आहे. अखेर नितेश कुमार सत्तेत सहभागी होताना सध्या तरी सामंजस्य सरकार चालवण्याचा तसेच लोकसभेच्या चाळीस पैकी 39 जागा जिंकण्याचं ध्येय दोन्ही पक्षांसमोर आहे त्यामुळे आगामी काळात ही युती दीर्घकाळ टिकणारी पुन्हा बिहारमध्ये भूकंप होणार याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष आहे.

# गोव्यात पंतप्रधान मोदींच्या ड्रीम प्रोजेक्टवरून वाद

## विमानतळाच्या विकासकामावरून मुख्यमंत्री सावंत यांच्यावर आरोप

। नवी दिल्ली ।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**गोव्यातील मोपाच्या म्हणजेच मनोहर पर्रीकर आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या जमिनीबाबत वाद निर्माण झाला आहे. गोवा मंत्रिमंडळाच्या निर्णयानंतर हा वाद सुरू झाला. मंत्रिमंडळाने विमानतळाची जमीन 60 वर्षांसाठी भाडेतत्त्वावर दिली होती. मोपा विमानतळ हे विमान पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या ड्रीम प्रोजेक्टपैकी एक आहे.**

पंतप्रधानांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी विकास आवश्यक असल्याचा सरकारचा दावा आहे. मात्र विरोधकांनी विकासात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला आहे. मोपा विमानतळाच्या वाढीव भाडेपट्टीवरून वाद सुरू झाला आहे. पंतप्रधान मोदींचा ड्रीम प्रोजेक्ट असल्याने गोव्याचे मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांनी नुकतीच मोपा आंतरराष्ट्रीय विमानतळावरील हॉटेल भूखंडांना 60 वर्षांच्या भाडेपट्ट्याने मंजुरी दिली होती, परंतु ही मंजुरी योग्य प्रक्रिया आणि कायदेशीर नियमांचे पालन न केल्याचा विरोधकांचा आरोप आहे. हा निर्णय सरकारी जमिनीच्या 40 वर्षांच्या लीज



कालावधीपेक्षा जास्त असल्याचा आरोप विरोधकांनी केला आहे. मुख्यमंत्र्यांनी नियमांचे उल्लंघन केले आहे आणि विमानतळाच्या विकासासाठी जीएमआर गोवा इंटरनॅशनल एअरपोर्ट्स लिमिटेड (जीजीआयएएल) सोबत स्वाक्षरी केलेल्या सुरुवातीच्या 40 वर्षांच्या सवलतीच्या कराराचाही गैरवापर केल्याचा आरोप आहे. पूर्वी 40 वर्षांची भाडेपट्टी होती. GGIAL सोबत 2016 मध्ये स्वाक्षरी केलेल्या करारामध्ये 40 वर्षांच्या लीजची तरतूद करण्यात आली होती, जी

### मुख्यमंत्र्यांचा पर्दाफाश करणार :आप

अमित पालेकर यांनी मुख्यमंत्र्यांनी ॲडव्होकेट जनरलच्या सल्ल्याकडेही का दुर्लक्ष केले आणि लीज 60 वर्षांपर्यंत का वाढवली, असा सवाल उपस्थित केला. मुख्यमंत्र्यांचे रिअल इस्टेट उद्योगाशी असलेले कथित संबंध लक्षात घेता हितसंबंधांच्या संभाव्य संघर्षाबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली आणि असा युक्तिवाद केला की या करारामुळे गोव्यातील शेतकऱ्यांच्या खर्चावर जीएमआरला फायदा होईल ज्यांनी विमानतळ प्रकल्पासाठी आपली जमीन दिली होती.'आप'ने दावा केला आहे की, ते लवकरच वैयक्तिकरित्या कागदपत्रे गोळा करून मुख्यमंत्र्यांचा पर्दाफाश करणार आहेत.याचा फायदा कोणत्या रिअल इस्टेट लॉबीला होईल हे देखील आम्ही शोधू काढू असा इशारा आपने दिला आहे.

सरकारी जमीन भाडेपट्ट्यांच्या नियमांनुसार होती. मात्र, GGIAL ने नंतर विमानतळाच्या "सिटी साइड" परिसरातील हॉटेल प्लॉटसाठी 60 वर्षांच्या उप-भाडेपट्टीची मागणी केली.

# हृतिक-दीपिकाचा 'फायटर' लवकरच पार करणार १०० कोटींचा टप्पा



हृतिक रोशन आणि दीपिका पदुकोण यांच्या 'फायटर' या चित्रपटाला चाहते, समीक्षक आणि प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. सिद्धार्थ आनंदच्या दिग्दर्शनाखाली बनलेल्या या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवरही जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. बॉक्स ऑफिसवर पहिल्याच दिवशी २२.५ कोटी रुपयांची कमाई या चित्रपटाने केली आहे. चित्रपटाच्या कलेक्शनमध्ये हळूहळू वाढ होत आहे. 'फायटर' या चित्रपटाने शनिवारी २८ कोटींहून अधिक कमाई केल्याचं स्पष्ट झालं आहे.इंडस्ट्री ट्रॅकर 'सॅकनिक'च्या रिपोर्टच्या सुरुवातीच्या अंदाजानुसार 'फायटर'ने तिसऱ्या दिवशी २७.५ कोटी रुपयांची कमाई केली आहे. या चित्रपटाने शुक्रवारी २६ जानेवारीला ३९.५ कोटींची कमाई केली होती. यासह, या चित्रपटाचे एकूण कलेक्शन आता ८९.५ कोटी रुपयांवर पोहोचले आहे त्यामुळे लवकरच हा चित्रपट १०० कोटींचा टप्पा पार करेल अशी शक्यता वर्तवली जात आहे. 'फायटर'च्या सकाळच्या शोलादेखील चांगली गर्दी होताना पाहायला मिळत आहे. तर संध्याकाळ व रात्रीचे शो हे जबरदस्त गर्दीत हाऊसफूल होत आहेत. इतकंच नव्हे तर समीक्षकांनीही या चित्रपटाला चांगला प्रतिसाद दिला असून येत्या रविवारी या कमाईच्या आकड्यात आणखी वाढ होणार याची शक्यता आहे. 'पठाण' आणि 'वॉर' फेम सिद्धार्थ आनंद दिग्दर्शित हा चित्रपट भारतीय वायु सेनेच्या शौर्य, बलिदान आणि देशभक्तीला श्रद्धांजली म्हणून सादर करण्यात आला आहे.गुरुवार २५ जानेवारी रोजी हा चित्रपट प्रदर्शित झाला. 'फायटर'मध्ये हृतिक रोशन, दीपिका पदुकोण, अनिल कपूर यांच्यासह अक्षय ओबेरॉय, करण सिंग ग्रोव्हर आणि संजीदा शेख यांच्याही भूमिका आहेत. या चित्रपटात हृतिक रोशन व दीपिका पदूकोण ही जोडी प्रथमच पडद्यावर दिसली अन् प्रेक्षकांना ती पसंतही पडली. तसेच चित्रपटातील काही बोल्ड सीन्सवर सेन्सॉरने कात्री चालवल्याने हा चित्रपट वादाच्या भोवऱ्यात अडकला होता.

हृतिक रोशन आणि दीपिका पदुकोण यांच्या 'फायटर' या चित्रपटाला चाहते, समीक्षक आणि प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. सिद्धार्थ आनंदच्या दिग्दर्शनाखाली बनलेल्या या चित्रपटाला बॉक्स ऑफिसवरही जबरदस्त प्रतिसाद मिळत आहे. बॉक्स ऑफिसवर पहिल्याच दिवशी २२.५ कोटी रुपयांची कमाई या चित्रपटाने केली आहे. चित्रपटाच्या कलेक्शनमध्ये हळूहळू वाढ होत आहे. 'फायटर' या चित्रपटाने शनिवारी २८ कोटींहून अधिक कमाई केल्याचं स्पष्ट झालं आहे.

## दारूच्या बाटलीवरुन नोकराला मारहाण

पाकिस्तानी गायक राहत फतेह अली खान यांचा एक व्हिडिओ समोर आला आहे, ज्यामुळे सगळेच हैराण झाले आहेत. चाहत्यांनाही हा व्हिडीओ पाहून मोठा धक्का बसला आहे. समोर आलेल्या व्हिडिओमध्ये राहत फतेह अली खान आपल्याच नोकराला मारहाण करताना दिसत आहेत. ही मारहाण करताना टेबलावर ठेवलेली दारूची बाटली गेली कुठे, अशी विचारणाही ते करताना दिसत आहेत. हा व्हिडिओ पाहिल्यानंतर लोकांनी राहत फतेह अली खान यांच्यावर बरीच टीका केली आहे. नेटकऱ्यांनी सोशल मीडियावर राहत यांना चांगलेच खडेबोल सूनवायला सुरुवात केली. हे पाहताच राहत यांनी एक व्हिडीओ शेअर करत घडलेल्या प्रकाराबद्दल माफी मागितली आहे. व्हिडीओमध्ये राहत आपल्या घरातील काम करणाऱ्या नोकराला चपलेने मारताना अन् खेचतान दिसत आहेत.

## यामीच्या घरी गुडन्यूज?



बॉलिवूड अभिनेत्री यामी गौतमसध्या तिच्या आर्टिकल 370 या सिनेमामुळे चर्चेत आहे. काही दिवसांपूर्वीच आर्टिकल 370 या सिनेमातील तिचा फर्स्ट लूक पोस्टर प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. याशिवाय टिझर आणि सिनेमाच्या रिलीज डेटबाबतही घोषणा करण्यात आली आहे. सिनेमाची घोषणा करण्यात आल्यानंतर अभिनेत्री यामी गौतमने पती आणि आई समवेत दिसली होती. दरम्यान आता यामीचा लूक पाहिल्यानंतर ती प्रेग्नंट असल्याच्या बातम्या व्हायरल होत आहेत. मात्र, या प्रेग्नंसीबाबत्या बातम्यांना यामीकडून कोणतेही प्रत्युत्तर देण्यात आलेले नाही. यामी गौतम आणि आदित्य धर मुंबईत एकत्रित स्पॉट झाली. यावेळी यामीने गुलाबी कलरचा सूट घातलेला दिसतोय. तर दिग्दर्शक आदित्य धर पांढऱ्या रंगाच्या कुर्त्यामध्ये यामीसोबत दिसत आहेत. दोघे एकत्रित दिसले आणि यामीच्या वेगळ्याच लूकने चाहत्यांचे लक्ष वेधलं आहे. यामी गौतम प्रेग्नंट असल्याच्या बातम्यांनी जोर धरलाय. दरम्यान यामीने गुलाबी सूटच्या ओढणीला वेगळ्या अंदाजात कॅरी करताना पाहिले. त्यामुळे सोशल मीडियावर चाहते यामी प्रेग्नंट असल्याची शक्यता वर्तवताना दिसत आहेत.

## प्रियांका चोप्राच्या पतीचं भारतात जोरदार स्वागत!

बॉलीवूडची देसी गर्ल प्रियांकाचा पती निक जोनास हा अमेरिकेतील प्रसिद्ध गायक आहे. निकचे मोठे भाऊ केविन आणि जो यांच्यासह 'जोनास ब्रदर्स' नावाचा त्यांचा बँड आहे, जो जगभरात प्रसिद्ध आहे. निक जोनास व त्याचे भाऊ केविन जोनास आणि जो जोनास हे भारतात आले आहेत. मुंबईच्या महालक्ष्मी रेसकोर्सवर शनिवारी त्यांचा भव्य संगीत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. हा त्यांचा भारतातील पहिला संगीत कार्यक्रम होता. भारतात निक आणि जोनास ब्रदर्सचे प्रचंड चाहते आहेत. निक गाण्यासाठी स्टेजवर येताच जमलेल्या प्रेक्षकांनी 'जीजू' असे संबोधित निकचे स्वागत केले. किंग आणि निकच्या "तू मान मेरी जान" या कोलॅबरेटेड गाण्यावर प्रेक्षक मंत्रमुग्ध होताना दिसले.जोनास ब्रदर्सचा भारतात पहिलाच कार्यक्रम असल्याने चाहते अतिउत्साही दिसत होते. शनिवारच्या या कार्यक्रमाचे व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल होताना दिसत आहेत. यात जोनास ब्रदर्स त्यांच्या कार्यक्रमाचा पुरेपूर आनंद घेताना दिसले.यातला मजेशीर भाग म्हणजे, जो आणि केविनने चाहत्यांना निकची ओळख 'जीजू' म्हणून करून दिली, त्यामुळे तिथे जमलेल्या प्रेक्षकांनी निकचा 'जीजू' 'जीजू' असा जयघोष करत स्वागत केले. २०२३ ला रीलिज झालेल्या ""तू मान मेरी जान" X 'आफ्टरलाईफ'" या गाण्यावर निक आणि किंगने एकत्र संगीत सादर केलं. कॉन्सर्टदरम्यान निक मजेशीररित्या प्रेक्षकांना म्हणाला, "भारतात परफॉर्म करण्याची आमची ही पहिलीच वेळ आहे. यात २०१८ मध्ये झालेल्या प्री वेडिंगमधला संगीत सोहळा ग्राह्य धरला जात नाही."भारतासाठी असलेल्या आपल्या भावना व्यक्त करत निक प्रेक्षकांना म्हणाला, "एक कुटुंब म्हणून आपलं या देशाशी घट्ट नातं आहे. तुमच्या या उत्साहपूर्ण स्वागतासाठी धन्यवाद. या संगीत कार्यक्रमासाठी तुमची उपस्थिती दर्शवल्याबद्दल मी तुमचा खूप आभारी आहे. या कॉन्सर्टची ही रात्र नक्कीच रोमांचक असेल, याचं मी आश्वासन देतो."

## आयशा खानने सांगितली धक्कादायक घटना



'बिग बॉस 17' या कार्यक्रमाचा ग्रँड फिनाले आज पार पडणार आहे. बिग बॉसच्या घरात वाईल्ड कार्ड एंट्री करणारी आयशा खान ही सध्या तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे चर्चेत आहे. आयशाचा एक एक व्हिडिओ व्हायरल होत आहे, ज्यामध्ये ती तिच्या बालपणाशी संबंधित एक धक्कादायक घटना सांगताना दिसत आहे. आयशानं एका मुलाखतीमध्ये सांगितलं की, ती 9 वर्षांची असताना एका व्यक्तीनं तिच्यासोबत वाईट कृत्य केलं होतं.आयशा खानने अलीकडेच सिद्धार्थ कन्नन्च्या मुलाखतीत तिच्यासोबत बालपणी घडलेल्या घटनेबद्दल सांगितलं. तिनं मुलाखतीमध्ये सांगितलं, "एक काका आले आणि त्यांनी मला बोलावले. मी विचारले, काय हवंय काका? त्यांनी मला एक पत्ता विचारला. मग त्यांना मी तो पत्ता सांगितला. मग त्यांनी विचारले की, मी तिथे तुला घेऊन जाऊ शकतो का? मी त्यांना होकार दिला."पुढे आयशा म्हणाली, "ते काका आणि मी एका इमारतीत गेलो. तिथून खाली येत असताना त्यांनी अचानक मला पायऱ्यांवर ढकलले. यानंतर ते माझ्यावर जबरदस्ती करू लागले. त्या क्षणी मला समजत नव्हते की, काय होत आहे. पण काहीतरी चुकीचं घडतंय हे माझ्या लक्षात येत होतं. पण नक्की काय होतंय? ते मी समजू शकले नाही. 9 वर्षांच्या मुलीला हे सर्व समजू शकत नाही. मला ओरडता येत नव्हते. त्यांनी माझ्या तोंडावर हात ठेवला. मीओरडण्याचा प्रयत्न करत होते मी त्यांना म्हणत होते, माझी आई तिथेच उभी आहे. प्लीज काका मला जाऊ द्या." यशानं पुढे मुलाखतीत सांगितलं.

# चौथ्या दिवशी इंग्लंडची कमाल!

## » इंडियाच्या फलंदाजांनी टॉम हार्टलीसमोर टेकले गुडघे

नवी दिल्ली । ।वृत्तसंस्था

**भारत आणि इंग्लंड संघांतील पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिला सामना रविवारी हैदराबादमध्ये पार पडला. या सामन्यात इंग्लंडने भारताचा २८ धावांनी पराभव केला. त्याचबरोबर पाच सामन्यांच्या मालिकेत १-० ने अशी आघाडी घेतली आहे. भारताला विजयासाठी २३१ धावांचे लक्ष्य मिळाले होते, मात्र भारतीय संघा २०२ धावांत गारद झाला. फिरकीपटूंना अनुकूल अशा खेळपट्टीवर भारतीय संघ आपल्याच जाळ्यात अडकला. या सामन्यात इंग्लंडच्या शानदार विजयाचे शिल्पकार ऑली पोप आणि सात विकेट्स घेणारा टॉम हार्टली ठरले.**




या सामन्यात इंग्लंडच्या फिरकीपटूंनी एकूण १८ विकेट्स घेतल्या. दोन्ही डावात भारताचा एकच फलंदाज धावबाद झाला. या सामन्यात जवळपास मागे पडलेल्या इंग्लंड संघाचे ऑली पोपने १९६ धावांची खेळी करत शानदार पुनरागमन केले. यानंतर, उर्वरित काम इंग्लिश फिरकी गोलंदाज टॉम हार्टलीने केले, जो पदार्पण कसोटी खेळत होता. हार्टलीने सात विकेट्स घेतल्या. पहिल्या डावात १९० धावांनी पिछाडीवर पडल्यानंतर इंग्लंडने भारताला २३१ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात टीम इंडिया २०२ धावांवर गारद झाली. भारताकडून दुसऱ्या डावात रोहित शर्माने सर्वाधिक ३९ धावा केल्या. यष्टिरक्षक केएस भरतने २८ धावा केल्या आणि फिरकी अष्टपैलू रविचंद्रन अश्विननेही २८ धावा केल्या. इंग्लंडकडून नवोदित टॉम हार्टलीने सात विकेट्स घेतल्या. याशिवाय जो रूट आणि जॅक लीच यांना प्रत्येकी एक विकेट मिळाली.या सामन्यात चौथ्या दिवसाच्या सुरुवातीपर्यंत भारतीय संघ मजबूत स्थितीत होता, मात्र चौथ्या दिवसाच्या शेवटी इंग्लंडने आश्चर्यकारक कामगिरी करत सामना जिंकला. १९० धावांनी पिछाडीवर असताना इंग्लंडने हा सामना जिंकला. इंग्लंडच्या या ऐतिहासिक विजयाचे शिल्पकार होते दुसऱ्या डावात १९६ धावा करणारा ऑली पोप आणि दुसऱ्या डावात सात विकेट्स घेणारा टॉम हार्टली. भारतीय संघ घरच्या मैदानावर शेवटचा कसोटी सामना इंग्लंडविरुद्धच हरला होता.पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेतील पहिल्या सामन्यात भारतीय संघाला 28 धावांनी पराभव स्वीकारावा लागला. हैदराबादच्या राजीव गांधी आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात भारताला चौथ्या डावात विजयासाठी 231 धावा करायच्या होत्या, परंतु संपूर्ण संघ 202 धावांवरच मर्यादित राहिला. इंग्लंडच्या विजयाचा हिरो ठरला नवोदित खेळाडू टॉम हार्टली ज्याने भारताच्या दुसऱ्या डावात सात विकेट्स घेतल्या. या विजयासह इंग्लंडने पाच सामन्यांच्या कसोटी मालिकेत 1-0 अशी आघाडी घेतली आहे. उभय संघांमधील दुसरा कसोटी सामना 2 फेब्रुवारीपासून विशाखापट्टणम येथे खेळवला जाणार आहे. एकंदरीत, बॅझबॉल'ची शैली इंग्लंडची असू शकते, परंतु टीम इंडियाच्या फलंदाजांनी हैदराबादमध्ये ही आक्रमण शैली आत्मसात केली आणि मुक्तपणे शॉट्स खेळले. याचा फायदा टीम इंडियालाही झाला आणि टीम इंडियाने इंग्लंडविरुद्ध मोठी धावसंख्या उभारली. मात्र, या वेगवान फलंदाजीमुळे टीम इंडियाच्या काही फलंदाजांनी जबरदस्तीने विकेट गमावल्या. टीम इंडियाचे अनेक आघाडीचे फलंदाज इंग्लंडच्या गोलंदाजांना बळी पडले आणि आक्रमक फटके खेळण्याचा प्रयत्न करत राहिले. टीम इंडियाचे फलंदाज कसे बाद झाले ते आम्ही तुम्हाला सांगतो. 'बॅझबॉल'चेही नुकसान झाले. टीम इंडियाच्या पहिल्या डावात रोहित शर्मा पहिल्यांदा बाद झाला. रोहितने आउट होण्यापूर्वी 24 धावा केल्या, त्यादरम्यान त्याचा फलंदाजीचा स्ट्राइक रेट 88.88 होता. जॅक लीचच्या चेंडूवर रोहित मोहात पडला आणि षटकार मारण्याच्या प्रयत्नात तो लाँग ऑनवर बाद झाला.

### गिल मिडविकेटवर बाद

» बाहेर जाताना हिटमॅनची निराशा स्पष्ट दिसत होती.मात्र चौकार मारण्याच्या प्रयत्नात शुभमन गिलही मिडविकेटवर बाद झाला. या सामन्यात भारतीय फलंदाज शुभमन गिलकडून दमदार कामगिरीची अपेक्षा होती. पण त्याने निराशा केली. पहिल्या डावात केवळ 23 धावा केल्यानंतर गिल बाहेर पडला. टॉम हार्टलीच्या चेंडूवर गिलने बेन डकेटचा झेल घेतला. गिल बऱ्याच दिवसांपासून कसोटी क्रिकेटमध्ये 'आउट ऑफ फॉर्म' आहे. ऑस्ट्रेलियाविरुद्ध वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप (WTC) फायनल झाल्यापासून गिलने क्रिकेटच्या या सर्वात मोठ्या फॉरमॅटमध्ये एकही अर्धशतक झळकावलेले नाही.

# ऑस्ट्रेलियन खेळाडूने वेस्ट इंडिजच्या क्षमतेवर प्रश्न

## » वेस्ट इंडिजच्या क्रेग ब्रॅथवेटने दंड दाखवत दिले प्रत्युत्तर

।नवी दिल्ली । प्रतिनिधी : महाईन्यूज

**२४ वर्षीय वेस्ट इंडिजचा वेगवान गोलंदाज शमर जोसेफच्या शानदार गोलंदाजीच्या जोरावर वेस्ट इंडिजने ऑस्ट्रेलियाचा ८ धावांनी पराभव केला. वेस्ट इंडिजने ऑस्ट्रेलियात २७ वर्षांनंतर कसोटी क्रिकेटमध्ये विजय मिळवला. या विजयानंतर वेस्ट इंडिजचा महान खेळाडू ब्रायन लारालाही आपले अश्रू आवरता आले नाहीत. वेस्ट इंडिजने दुसरी कसोटी जिंकत मालिका १-१ ने बरोबरीत राखली.**

कर्णधार क्रेग ब्रॅथवेटने विशेषतः माजी ऑस्ट्रेलियन खेळाडू रॉडनी हॉजला लक्ष्य केले, ज्याने या संघाच्या क्षमतेवर प्रश्न उपस्थित केले होते.सामन्यानंतर वेस्ट इंडिज संघाचा कर्णधार क्रेग ब्रॅथवेट म्हणाला की रॉडनी हॉजने आमच्या संघासाठी जे शब्द वापरले होते, ते शब्द त्यांचे प्रेरणास्थान बनले. ब्रॅथवेट म्हणाला, 'मला सांगायचे आहे की असे दोन शब्द होते, ज्यामुळे आम्हाला प्रेरणा मिळाली. मिस्टर रॉडनी हॉज यांनी आम्हाला दयनीय आणि हताश म्हटले होते. हेच शब्द आमच्यासाठी प्रेरणादायी ठरले. आम्ही तसे नाहीत हे जगाला दाखवायचे होते.' यानंतर ब्रॅथवेटने आपले दंड दाखवले आणि म्हणाला, 'मला त्यांना विचारायचे आहे की माझे हे स्नायू त्यांच्यासाठी



पुरेसे आहेत का.' हे ऐकून प्रश्न विचारणारी अँकरही हसायला लागली. ब्रॅथवेटच्या संघाने केवळ रॉडनी हॉजलाच नाही तर प्रत्येक टीकाकाराला उत्तर दिले आहे.वेस्ट इंडिजच्या दुसऱ्या डावात मिचेल स्टार्कच्या यॉर्करने जोसेफला दुखापत झाल्याने त्याला मैदान सोडावे लागले होते. त्याने गोलंदाजीत चमकदार कामगिरी करत ६८ धावांत सात विकेट्स घेतल्या आणि ऑस्ट्रेलियाला २०७ धावांत गुंडाळले. युवा खेळाडूचे कौतुक करताना ब्रॅथवेट म्हणाला, 'तो सुपरस्टार आहे. मला माहित आहे की तो वेस्ट इंडिजसाठी खूप काही करेल. त्याने मला सांगितले की जोपर्यंत आम्ही जिंकत नाही तोपर्यंत तो गोलंदाजी करणे थांबवणार नाही. त्यामुळे मला माझ्या संघाचा खूप अभिमान आहे. त्याने खूप हिंमत दाखवली.'वेस्ट इंडिजच्या विजयानंतर शमर जोसेफने ब्रॉडकास्टरला सांगितले की, 'आज सकाळी मी मैदानात येणार नव्हतो. मी डॉक्टरांचे कौतुक केले पाहिजे. कारण ते माझ्यासाठी एक अद्भुत व्यक्ती आहेत. त्यांनी मला एका कारणासाठी मैदानात येण्यास सांगितले, भले ते फक्त लोकांना पाठिंबा देण्यासाठी असेल. पण मी आलो आणि त्यांनी माझ्या पायाच्या बोटावर काही उपचार केले. मला माहित नाही त्यांनी काय केले पण त्याचा फायदा झाला. त्यामुळे मला मैदानात उतरून गोलंदाजी करण्याची आणि हा सामना माझ्या संघाच्या बाजूने झुकवण्याची संधी मिळाली.

### वेस्ट इंडिजने दुसरा सामना जिंकला

» प्रत्युत्तरात ऑस्ट्रेलियाने नऊ विकेट्सवर २८९ धावा करून पहिला डाव घोषित केला. दुसऱ्या डावात वेस्ट इंडिजचा संघ अवघ्या १९३ धावांत गारद झाला आणि ऑस्ट्रेलियासमोर विजयासाठी २१६ धावांचे लक्ष्य ठेवले. कांगारू संघ केवळ २०७ धावा करू शकला. अशा प्रकारे वेस्ट इंडिजने दुसरा सामना आठ धावांनी जिंकला.